**शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व संलग्न रुग्णालय परिसरात सुसज्ज धर्मशाळा उभारण्यास मान्यता देण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
## शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-०४२५/प्र.क्र.१३६/प्रशा-२

गो. ते. संकुल इमारत, ९ वा मजला,
लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
तारीख : २० जुलै, २०२६

**वाचा:-**

१) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन-२०१८/प्र.क्र.३८/ज-१,दि. २५.०९.२०१९
२) सेवादान आरोग्य फाऊंडेशन, अहमदाबाद यांचे दिनांक २०.०८.२०२५ रोजीचे पत्र.
३) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांचे पत्र क्र. डीएमईआर-११०३१/ ३/ २०२५-सीईटीआयटी, दिनांक २१.०१.२०२५

**प्रस्तावना:-**

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व संलग्न रुग्णालयांमध्ये राज्यातील तसेच राज्याबाहेरील मोठ्या संख्येने रुग्ण उपचारासाठी दाखल होत असतात. अशा रुग्णांच्या नातेवाईकांना अल्पदरात सुरक्षित निवास, स्वच्छतागृह, स्नानगृह, पिण्याचे पाणी, भोजन व्यवस्था व इतर मूलभूत सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सेवादान आरोग्य फाऊंडेशन, अहमदाबाद या नफा-न-तोटा तत्वावर कार्य करणाऱ्या संस्थेने दिनांक २०.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये संचालनालय अधिनस्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या परिसरात धर्मशाळा / विश्रामगृह उभारण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सेवादान आरोग्य फाऊंडेशन, अहमदाबाद ही रुग्णांच्या नातेवाईकांना निवास, भोजन व इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी “नफा-ना-तोटा” तत्त्वावर कार्य करणारी सेवाभावी संस्था आहे. रुग्णालयात उपचारासाठी दाखल झालेल्या रुग्णांच्या कुटुंबीयांना निवास, भोजन व भावनिक आधार उपलब्ध करून देणे हा संस्थेचा मुख्य उद्देश आहे. सदर संस्थेमार्फत गुजरात, उत्तर प्रदेश, आसाम, उत्तराखंड, छत्तीसगड व राजस्थान राज्यांतील विविध शासकीय रुग्णालयांमध्ये रुग्णांच्या नातेवाईकांसाठी धर्मशाळा/विश्रांतीगृह प्रकल्प यशस्वीरित्या राबविण्यात येत आहेत. त्याअनुषंगाने, संचालनालयाच्या अधिपत्याखालील सहा शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व संलग्न रुग्णालयांमध्ये सेवादान आरोग्य फाऊंडेशन, अहमदाबाद यांच्या माध्यमातून "ना नफा - ना तोटा" तत्त्वावर धर्मशाळा/विश्रांतीगृह उभारणे, विकसित करणे, संचालन करणे व देखभाल करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## <u>शासन निर्णय:-</u>

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील (१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर, (२) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर, (३) बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे, (४) श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ आणि (५) सर ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर जे. जे. समूह रुग्णालय, मुंबई (६) छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर येथे उपचारासाठी दाखल होणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांसाठी धर्मशाळा/विश्रांतीगृह उभारणे, विकसित करणे, संचालन करणे व देखभाल करण्यासाठी सेवादान आरोग्य फाऊंडेशन, अहमदाबाद या संस्थेमार्फत " नफा-ना-तोटा तत्त्वावर" व "Cost Recovery Model" या तत्त्वांवर प्रकल्प राबविण्यास तसेच त्यासाठी ४९ वर्षांच्या कालावधीसाठी सामंजस्य करार (MoU) करण्यास, खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

## <u>अटी व शर्ती:-</u>

१) उपरोक्त प्रयोजनाकरीता सेवादान आरोग्य फाऊंडेशन, अहमदाबाद यांचे प्रतिनिधी सोबत सामंजस्य करार करण्यास आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

२) सदर प्रकल्पासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्यमान नियमानुसार प्रस्तावित खाटांच्या विश्रामगृहाच्या बांधकामासाठी आवश्यक असलेली जमीन सेवादान आरोग्य फाऊंडेशन, अहमदाबाद यांना रुपये १/- (अक्षरी रुपये एक फक्त) प्रति वर्ष या नाममात्र भुईभाड्याने ४९ वर्षांच्या कालावधीसाठी भाडेपट्ट्याने (Lease) उपलब्ध करून देण्यात येईल. आवश्यकतेनुसार व प्रचलित शासकीय धोरणानुसार सदर भाडेपट्ट्याचे एकदाच कमाल ४९ वर्षांसाठी नूतनीकरण करता येईल. तथापि, संबंधित जमिनीची मालकी, ताबा व नियंत्रण महाराष्ट्र शासनाकडेच राहील.

३) सदर प्रकल्पासाठी आवश्यक असलेला संपूर्ण भांडवली खर्च, वित्तपुरवठा, इमारत बांधकाम, सुसज्जीकरण, संचालन, देखभाल, सुरक्षा, स्वच्छता, मनुष्यबळ, विमा संरक्षण, उपयुक्तता सेवा तसेच आवश्यक सर्व वैधानिक परवानग्या व अनुपालन यांची जबाबदारी सेवादान आरोग्य फाऊंडेशनची राहील.

४) प्रकल्पासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून देणे, आवश्यक परवानग्या व मंजुरी प्राप्त करण्यासाठी सहकार्य करणे तसेच प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक प्रशासकीय सहाय्य उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनाची राहील.

५) जमिनीचा वापर केवळ रुग्ण व रुग्णांच्या नातेवाईकांसाठी विश्रांतीगृहासाठीच करावा. कोणत्याही प्रकारे हस्तांतर, उपभाडेपट्टा किंवा इतर वापर करता येणार नाही.

६) सदर विश्रांतीगृहामध्ये रुग्णांच्या नातेवाईकांसाठी वाजवी व परवडणाऱ्या दरात निवास, भोजन, सुरक्षा, स्वच्छता तसेच इतर आवश्यक कल्याणकारी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील.

७) सामंजस्य कराराची अंमलबजावणी झाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत सेवादान आरोग्य फाऊंडेशनकडून सविस्तर प्रकल्प विकास आराखडा आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या शिफारशीसह शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

८) सदर धर्मशाळा/विश्रांतीगृहाच्या इमारतीचे बांधकामास आवश्यक सर्व परवानग्या प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत पूर्ण करून कार्यान्वित करणे आवश्यक राहील.

९) सदर प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी, देखरेख, समन्वय, तक्रार निवारण व शासन निर्णयातील अटी व शर्तींचे पालन सुनिश्चित करण्यासाठी प्रत्येक प्रकल्पस्थळी खालील प्रमाणे जिल्हास्तरीय संयुक्त व्यवस्थापन समिती गठीत करण्यात येईल.

| अ.क्र. | पदनाम | भूमिका |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नसावा) | अध्यक्ष |
| २ | अधिष्ठाता, संबंधित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय | उपाध्यक्ष |
| ३ | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य |
| ४ | जिल्हा अग्निशमन अधिकारी / प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | जिल्हा शल्यचिकित्सक / जिल्हा आरोग्य अधिकारी (आवश्यकतेनुसार) | सदस्य |
| ६ | सेवादान आरोग्य फाऊंडेशनचे दोन प्रतिनिधी | सदस्य |
| ७ | वैद्यकीय अधीक्षक, संबंधित रुग्णालय | सदस्य सचिव |

**<u>समितीची कार्ये :-</u>**

१. सदर समिती विश्रांतीगृहाच्या कामकाजाची नियमित पाहणी, तपासणी व मूल्यमापन करेल.

२. विश्रांतीगृहामध्ये उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांचे अंतिमीकरण करून निवास, भोजन व इतर सेवांचे शुल्क निश्चित करण्याबाबतचा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी शासनास (वैद्यकीय शिक्षण विभागास) सादर करणे.

३. विश्रामगृहाच्या बांधकामाच्या प्रगतीचा त्रैमासिक आढावा घेणे.

४. शासन निर्णयातील अटी व शर्तींचे पालन होत असल्याची खात्री करणे.

५. रुग्ण व नातेवाईकांच्या तक्रारींचे निराकरण करणे.

६. वार्षिक लेखापरीक्षण, अग्निसुरक्षा व संरचनात्मक सुरक्षा अहवालांचे परीक्षण करून आवश्यक सूचना देणे.

७. विश्रामगृहाचा वापर केवळ रुग्णांच्या नातेवाईकांसाठी होत असल्याची खात्री करणे.

८. कोणत्याही अनियमिततेबाबत आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांना आवश्यक अहवाल सादर करणे.

९. सहामाही प्रगती अहवाल शासनास सादर करणे.

१०. सदर सुविधा केवळ शासकीय रुग्णालयात दाखल रुग्णांच्या नातेवाईकांसाठीच उपलब्ध असेल.

११. शासन अथवा संबंधित रुग्णालयाचे प्रतिनिधी कोणत्याही वेळी तपासणी करून अटींचे पालन व सुविधा उपलब्धतेची पडताळणी करू शकतील.

१२. धर्मशाळेत कार्यरत कर्मचारी कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्र शासनाचे कर्मचारी समजले जाणार नाहीत.

१३. शासनास कोणत्याही वेळी सार्वजनिक हितास्तव सदर व्यवस्था पुनरावलोकन करून आवश्यक बदल करण्याचा अधिकार राहील.

१४. कराराची मुदत संपुष्टात आल्यानंतर अथवा करार कोणत्याही कारणास्तव समाप्त झाल्यास, विश्रांतीगृहाची इमारत, त्यास संलग्न सर्व स्थावर मालमत्ता, पायाभूत सुविधा व इतर संपत्ती कोणत्याही मोबदल्याशिवाय महाराष्ट्र शासनाकडे हस्तांतरित करण्यात येईल. त्यानंतर सेवादान आरोग्य फाऊंडेशनचा सदर मालमत्तेवर कोणताही मालकी हक्क, स्वारस्य अथवा दावा राहणार नाही.

१५. सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीशी संबंधित इतर सर्व बाबींचा तपशील महाराष्ट्र शासन व सेवादान आरोग्य फाऊंडेशन यांच्यामध्ये करण्यात येणाऱ्या सामंजस्य करारामध्ये नमूद करण्यात येईल.

२. या शासन निर्णयातील तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी, सनियंत्रण व देखरेख करण्याची जबाबदारी आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांची राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२०१५००३४३७५१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MAHADEO GIRDHARI JOGDAND

Digitally signed by MAHADEO GIRDHARI JOGDAND
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDD, 2.5.4.20=0477D837DC0B00FC2CBD45D17D07C625C3417378F97D493A8A277FAA29F65459, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C1D08CFDEE92DA209D709F5456D9EDE95236B8A8E7E2A2801B8FED03DCF793D3, cn=MAHADEO GIRDHARI JOGDAND
Date: 2026.07.20 15:51:57 +05'30'

**( म. गि. जोगदंड )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास विभाग) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
७. महालेखापाल, महाराष्ट्र ½, (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
८. अपर मुख्य सचिव (वित्त विभाग) चे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव (महसूल विभाग) चे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

१०. सचिव, (वैद्यकीय शिक्षण) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
११. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन तसेच आयुष संचालनालय, मुंबई.
१२. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
१३. जिल्हाधिकारी, मुंबई.
१४. जिल्हाधिकारी, पुणे
१५. जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर
१६. जिल्हाधिकारी, नागपूर
१७. जिल्हाधिकारी, यवतमाळ
१८. जिल्हाधिकारी, कोल्हापूर.
१९. सर्व संबंधित अधिष्ठाता/ अधीक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालये.
२०. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
२१. सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
२२. अवर सचिव (प्रशा-१), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
२३. संचालक, सेवादान आरोग्य फाऊंडेशन, अहमदाबाद.
२४. निवडनस्ती (प्रशा-२)